**२५ वषे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीकरिता**

**अपघात विरहीत सेवा केलेल्या चालकांचा**

***आणि***

**प्रवासी वाढवा विशेष अभियान-२००९ अंतर्गत**

**उत्कृष्ट कामगिरी करणारे वाहक, आगार, व विभाग यांचा**

# विशेष गौरव समारंभ

*************

**२५ वषे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीकरिता अपघात विरहीत सेवा करणा-या** २१४ चालकांचा सपत्नीक गौरव समारंभ राज्याचे **परिवहन राज्यमंत्री मा. ना. श्री. गुलाबराव देवकर** यांच्या शुभहस्ते, **रा. प. महामंडळाचे अध्यक्ष मा. श्री. सुधाकरपंत परिचारक** यांच्या अध्यक्षतेखाली, **रा. प. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. दीपक कपूर** यांचे प्रमुख उपस्थितीत दि. १८ फेब्रुवारी, २०१० रोजी पुण्याजवळील पिंपरी-चिंचवड येथील आचार्य अत्रे सभागृहात संपन्न झाला. यावेळी गौरव प्राप्त चालकांना प्रत्येकी  रु. ७,०००/- रोख, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि त्यांच्या धर्मपत्नीस साडी - खण देऊन सन्मानित करण्यांत आले.

याप्रसंगी, जानेवारी ते मार्च, २००९ दरम्यान राबविण्यांत आलेल्या **प्रवासी वाढवा विशेष अभियानात** उत्कृष्ट कामगिरी करणा-या १०५ वाहक, ३७ आगार व ८ विभागांना सुध्दा रोख बक्षीस देऊन गौरविण्यांत आले.  वाहकांना प्रत्येकी रु. १,०००/- रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह तर ८ विभागांना प्रत्येकी रु. २५,०००/- रोख आणि ३७ आगारांना त्यांच्या कामगिरीनुसार एकूण रु. १४.५० लाख रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यांत आले.